# राष्ट्रीय लोक अदालत

## दिवाणी व फौजदारी न्यायालय

(विधी सेवा प्राधिकरण कायदा,१९८७ (केंद्रीय कायदा) चे कलम १९ नुसार आयोजीत)

निशाणी क्रं. 21

**प्रकरण क्रमांक** :- **दिवाणी दावा क्रं.११/२०२६**

**वादीचे नाव** :- **बाळासाहेब पि.मनोहर शिंदे**

**प्रतिवादीचे नाव** :-**१.रसिका भ्र.मनोहर शिंदे**
**२.रोहित पि.मनोहर शिंदे**
**३.हरिश्चंद्र पि.संभाजी शिंदे**
**४.मुद्रीका उर्फ मुद्रीकाबाई भ्र.हरिश्चंद्र शिंदे**
**५.दगडूसाहेब पि.हरिश्चंद्र शिंदे**
**६.मोहन पि.हरिश्चंद्र शिंदे**

**दावा :- वाटणी व कब्जेबाबत.**

**न्यायालयाचे नाव :- मे.दिवाणी न्यायाधिश साहेब (क.स्तर) चाकूर यांचे न्यायालयात**

**(१) पॅनल प्रमुख/न्यायीक अधिकारी यांचे नांव :- श्री.** व्ही. एम. वाघमोडे साहेब

**(२) पॅनल सदस्य :-** **श्री.** ॲड. के.बी. पाटील.

## अवार्ड

दोन्ही पक्षांमधील वाद सामंजस्याने मिटवण्यासाठी प्रस्तुतचे प्रकरण हे आजरोजी राष्ट्रीय लोक अदालत समोर सादर करण्यात आले आहे.उभय पक्षकारांनी या लोक अदालतसमक्ष तडजोड केली आहे आणि त्यांच्या तडजोडीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

# तडजोड पत्र

सदरील प्रकरणात वादी व प्रतिवादी यांच्यात खालीलप्रमाणे तडजोड झाली आहे.

१) हे की, सदरील प्रकरणातील वादी व प्रतिवादी यांच्यात आपआपसात गावातील पंचासमक्ष तडजोड झाली आहे. वादी व प्रतिवादी यांना दाव्यात दर्शविलेप्रमाणे नातेसंबंध मान्य व कबूल आहे.

२) हे की,वादीने दाव्यात कथन केलेल्या वाद मिळकती या वडीलोपार्जीत व एकत्र कुंटुबाच्या मिळकती आहेत हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

३) हे की,सदर तडजोडीनुसार **वादी बाळासाहेब पि.मनोहर शिंदे** यांच्या हिस्यास **मौजे उमरगा कोर्ट,**ता.अहमदपूर,जि.लातूर येथील **जमीन गट नं.३७८** मधील **क्षेत्रफळ ०१ हे.५६ आर आकार २.१७ पैसेची** जमीन वाटून आली आसून ज्याची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस :- भगवान नामदेव भिकाणे यांची जमीन

पश्चिमेस :- प्रतिवादी क्रं.२ रोहित मनोहर शिंदे याच्या हिस्यास सदर तडजोडीनुसार सदर गटातील वाटून आलेली ०१ हे.०० आर जमीन

दक्षिणेस :- भगवान भानुदास मद्दे व गोपाळ ग्यानोबा घोसे यांची जमीन

उत्तरेस :- गोविंद नामदेव भिकाणे व भगवान नामदेव भिकाणे यांची जमीन

वरील चतु:सिमेच्या आतील जमीन ही **वादी बाळासाहेब पि.मनोहर शिंदे** यांच्या हिस्यास वाटून आल्याचे व सदर जमिनीवर वादी हे काबीज आसल्याचे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

४) हे की,सदर तडजोडीनुसार **प्रतिवादी क्रं.१ रसिका भ्र.मनोहर शिंदे** यांच्या हिस्यास **मौजे हिंपळनेर,**ता.चाकूर,जि.लातूर येथील **जमीन गट नं.७५** मधील **पूर्ण क्षेत्रफळ ०० हे.०६ आर आकार ०.११ पैसे व गट क्रं.७६/२ मधील क्षेत्रफळ ० हे.२० आर आर आकार ०.३० पैसेची** जमीन वाटून आली असून सदरील दोन्हीही जमिनी एकमेकास लगत असून ज्याची एकत्रित चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस :- सदाशिव पांडुरंग शिंदे यांची जमीन

पश्चिमेस :- रत्नाकर बाबासाहेब जाधव यांची जमीन

दक्षिणेस :- प्रल्हाद राघोबा शिंदे यांची जमीन

उत्तरेस :- रत्नाकर बाबासाहेब जाधव यांची जमीन

तसेच सदर तडजोडीनुसार **प्रतिवादी क्रं.१ रसिका भ्र.मनोहर शिंदे** यांच्या हिस्यास **मौजे हिंपळनेर,**ता.चाकूर,जि.लातूर येथील **जमीन गट नं.७८** मधील **पूर्ण क्षेत्रफळ ०० हे.१५ आर आकार ०.२५ पैसे व गट क्रं.७९ मधील पूर्ण क्षेत्रफळ ० हे.१५ आर आकार ०.२५ पैसेची** जमीन वाटून आली असून सदरील दोन्हीही जमिनी एकमेकास लगत असून ज्याची एकत्रित चतु:र्सिमा खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस :- शेषेराव राघोबा शिंदे यांची जमीन

पश्चिमेस :- सदाशिव पांडुरंग शिंदे यांची जमीन

दक्षिणेस :- सदाशिव पांडुरंग शिंदे यांची जमीन

उत्तरेस :- नाला

वरील चतु:र्सिमेच्या आतील जमिनी हया **प्रतिवादी क्रं.१ रसिका भ्र.मनोहर शिंदे** यांच्या हिस्यास वाटून आल्याचे व सदर जमिनीवर प्रतिवादी क्रं.१ ही काबीज आसल्याचे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

५) हे की,सदर तडजोडीनुसार **प्रतिवादी क्रं.२ रोहित पि.मनोहर शिंदे** यांच्या हिस्यास **मौजे उमरगा कोर्ट,**ता.अहमदपूर,जि.लातूर येथील **जमीन गट नं.३७८** मधील **क्षेत्रफळ ०१ हे.०० आर आकार १.४० पैसेची** जमीन वाटून आली आसून ज्याची चतु:र्सिमा खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| पूर्वेस | :- वादी बाळासाहेब मनोहर शिंदे यांच्या हिस्यास सदर तडजोडीनुसार सदर गटातील वाटून आलेली ०१ हे.५६ आर जमीन |
| पश्चिमेस | :- सडक |
| दक्षिणेस | :- भगवान भानुदास मद्दे व गोपाळ ग्यानोबा घोसे यांची जमीन |
| उत्तरेस | :- गोविंद नामदेव भिकाणे व भगवान नामदेव भिकाणे यांची जमीन |

वरील चतु:र्सिमेच्या आतील जमीन ही **प्रतिवादी क्रं.२ रोहित पि.मनोहर शिंदे** यांच्या हिस्यास वाटून आल्याचे व सदर जमिनीवर प्रतिवादी क्रं.२ हे काबीज आसल्याचे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

५) हे की,सदर तडजोडीनुसार **प्रतिवादी क्रं.४ मुद्रीकाबाई भ्र.हरिश्चंद्र शिंदे** यांच्या हिस्यास **मौजे हिंपळनेर,**ता.चाकूर,जि.लातूर येथील **जमीन गट नं.६२/१** मधील **क्षेत्रफळ ०० हे.८२ आर आकार १.७३ पैसेची** जमीन वाटून आली आसून ज्याची चतु:र्सिमा खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| पूर्वेस | :- रामकिशन त्र्यंबक शिंदे यांची जमीन |
| पश्चिमेस | :- गाडीरस्ता |
| दक्षिणेस | :- रामकिशन त्र्यंबक शिंदे यांची जमीन |
| उत्तरेस | :- प्रल्हाद राघोबा शिंदे यांची जमीन |

वरील चतु:र्सिमेच्या आतील जमीन ही **प्रतिवादी क्रं.४ मुद्रीकाबाई भ्र.हरिश्चंद्र शिंदे** यांच्या हिस्यास वाटून आल्याचे व सदर जमिनीवर प्रतिवादी क्रं.४ ही काबीज आसल्याचे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.

६) हे की, **प्रतिवादी क्रं.३ हरिश्चंद्र पि.संभाजी शिंदे,प्रतिवादी क्रं.५ दगडूसाहेब पि.हरिश्चंद्र शिंदे,प्रतिवादी क्रं.६ मोहन पि.हरिश्चंद्र शिंदे** यांनी त्यांच्या राजीखुशीने सदरील वडीलोपार्जीत व एकत्र कुंटुबाच्या जमीन जायजादीतील त्यांचा संपूर्ण कायदेशिर हक्क/हिस्सा वादी व प्रतिवादी क्रं.१,२,४ यांच्या हक्कात विनामोबदला कायमस्वरुपी सोडून दिलेला आहे.

७) हे की,वादीचा दावा सदर तडजोडीनुसार डिक्री करण्यात यावा व सदर तडजोडीनुसार महसूली रेकॉर्डला,७/१२ रेकॉर्डला वादी व प्रतिवादी क्रं.१,२,४ यांच्या हिस्यास वाटून आलेल्या जमिनीच्या नोंदी घेण्यास व अंमल घेण्यास एकमेकांचा उजर,आक्षेप राहणार नाही हे वादी व प्रतिवादी यांना मान्य व कबूल आहे.तसेच सदर वाटपपत्राआधारे तुकडेबंदी कायदयाचे उल्लंघन होत नाही.

८) हे की,तडजोडीचा खर्च ज्यांचा त्यांनी सोसावा असे ठरले आहे.

**तरी विनंती की,**

सदरील तडजोडीनुसार वादीचा दावा डिक्री करण्यात यावा.

दिनांक :- १४/०३/२०२६.

वादी

बाळासाहेब पि.मनोहर शिंदे

प्रतिवादी

१.रसिका भ्र.मनोहर शिंदे

२.रोहित पि.मनोहर शिंदे

३.हरिश्चंद्र पि.संभाजी शिंदे

४.मुद्रीका उर्फ मुद्रीकाबाई भ्र. हरिश्चंद्र शिंदे

५) दगडूसाहेब पि.हरिश्चंद्र शिंदे

६) मोहन पि.हरिश्चंद्र शिंदे

वादीचे वकील

ॲड.एस.डी.शिवपूरकर

ॲड.डी.आर.हाक्के

चाकूर

प्रतिवादीचे वकील

ॲड.एस.एम.करंडे

चाकूर

न्यायिक अधिकारी ( पॅनल प्रमुख)

विधिज्ञ ( पॅनल सदस्य)

**विधी सेवा समिती/प्राधिकरण शिक्का**

**स्थळ :-चाकूर**

**दिनांक :- १४/०३/२०२६.**